# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे दीपस्तंभ - धम्मपद

**डॉ. स्निग्धा एस. सदाफळे**
सहयोगी प्राध्यापक, विभागप्रमुख,
पालि विभाग डॉ. आंबेडकर महाविद्यालय,
चंद्रपूर. (महाराष्ट्र) 442402.
snigdha210675@gmail.com Mb. 9673309784.

## सारांश

मानवी जीवनात सुजाण नागरिक घडवण्यासाठी विद्यार्थी दशा अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजाविते. याच विद्यार्थी जीवनात आव्हानांना पेलण्यासाठी शहाणपणाची गरज असते. कारण ज्ञानासोबत व्यक्तिमत्त्वाचा विकास, आजीविकेचे योग्य साधन, जीवनशैली, ध्येय-ध्यास यांचाही ताळमेळ तो बसवत असतो. त्यामुळे त्याला अनेक दुविधा, ताण-तणाव आणि प्रलोभनांना एकत्र पेलावे लागते. त्यावेळी धम्मपद ग्रंथ त्यांना दीपस्तंभाप्रमाणे जाणवतो. कारण मनाची एकाग्रता साधने अभ्यासात सातत्य राखणे शिकवितो. त्याचप्रमाणे वेळेचे नियोजन कसे करावे, मन विचलित होऊ नये म्हणून काय करावे? इत्यादी बाबी विद्यार्थ्यांना धम्मपद ग्रंथातून शिकता येतात. नैतिक शिक्षणासोबतच सत्य, अहिंसा, करुणा, त्याग, संयम, विवेक या मूल्यांची शिकवण धम्मपद ग्रंथ देतो. इतराविषयीच्या द्वेषातून, वैरातून मुक्ती कशी मिळावी हे विद्यार्थी शिकतात. त्यामुळे ते भावनिक व आध्यात्मिकदृष्ट्या अधिक प्रगल्भ बनतात.

आज डिजिटल युगात जिथे सोशल मीडिया तंत्रज्ञानामुळे मुलांचे मन विचलित होऊन ते ध्येयापासून भटकत आहेत. त्यावेळी त्यांना ज्ञान व स्व-शिक्षणाची शिकवण धम्मपदातून मिळते. फक्त परीक्षेतच तारून नेण्याची क्षमता धम्मपद ग्रंथात नाही तर संपूर्ण जीवनात ते कधीही अनैतिक वर्तन घडवून विचलित होणार नाहीत. तणावरहित

जीवन जगण्याची कला व खऱ्या अर्थाने संवेदनशील आणि उद्देशपूर्ण व्यक्तिमत्व बनविते. चंचल मनाला शिस्त लावून विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासात दीपस्तंभ म्हणून धम्मपद ग्रंथाच्या भूमिकेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**बीज शब्द** - धम्मपद, शिक्षण, विकास, विद्यार्थी, दीपस्तंभ.

**प्रस्तावना**

धम्मपद केवळ एक ग्रंथ नसून तो मानवी जीवनासाठी विशेषतः विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक दीपस्तंभ आहे. बौद्धांच्या धम्मग्रंथाला त्रिपिटक असे म्हणतात. याचे तीन पिटाऱ्यात विभाजन होते. सुत्तपिटकाचे पाच निकायामध्ये विभाजन होते. शेवटच्या खुद्दक निकायाचे स्वतंत्र १५ ग्रंथांपैकी दुसऱ्या क्रमांकाचा धम्मपद ग्रंथ महत्त्वाचा आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे की पूर्णपणे पद्यमय स्वरूपाचा असून मानवाला सदाचारनाची शिकवण देतो.

संपूर्ण तिपिटकातील बुद्ध वाणीतील पद्यमय गाथांचे संकलन धम्मपद या ग्रंथात केले आहे. या ग्रंथामध्ये २६ वग्ग् असून ४२३ गाथांचा समावेश असून प्रत्येक वग्ग् एका वेगळ्या विषयाचे विश्लेषण करतो व शिकवण देतो. मानवी मन हे चंचल आहे. त्याला शिस्त लावून प्रगती साधण्यासाठी कसे प्रयत्नशील राहावे हे धम्मपद शिकवतो. याशिवाय एकाग्रता कशी साधावी याचीही शिकवण देतो. चित्तवग्गात मनाला अधिक ओजस्वी करण्यासाठी काय व कसे वर्तन करावे? याविषयक शिकवण मिळते. ज्याप्रमाणे बाण बनविणारा सरळ बाण सरळ बनवितो त्याप्रमाणे शहाणा विद्यार्थी चंचल मनाला सरळ एकाग्र करतो. मन इकडे तिकडे भटकू न देता त्याला योग्य ध्येयावर केंद्रित करणे शिकवितो. शिस्त, जागृती, सातत्य ही मूल्ये तो अभ्यासतो. विद्यार्थी जीवनात वेळेला खूप महत्त्व आहे. आळस सोडून वेळेचे नियोजन कसे करावे, अभ्यासाप्रती सजग कसे

राहावे हे तो अपमाद वग्गातून शिकतो. सकारात्मक आचार-विचार ठेवल्यास परीक्षेत यशस्वी होता येते. इतरांशी स्पर्धा करण्यापेक्षा स्वतःची प्रगती करण्यावर भर दिल्याने स्वतःवर विजय मिळवून वाईट सवयीवर मात करणे शिकतो.

**धम्मपद दीपस्तंभ-**

धम्मपदग्रंथातील गाथा केवळ नैतिक जीवन नाही तर उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेली बौद्धिक शिस्त, मानसिक परिपक्वता आणि योग्य जीवनदृष्टी शिकवितो. शिक्षण म्हणजे फक्त पदवी मिळविणे नसून विचारशील, विवेकाने जबाबदार व्यक्तिमत्व घडविणे होय. त्यामुळेच योग्य नागरिक तयार होत असतो. शिक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका मनाची असते. मनावर नियंत्रण व एकाग्रता यमकवग्गातून शिकविलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जागरूकता व सातत्य मिळवून परिश्रमातून पुढे जात, आळस सोडत अलौकिक गोष्टींचा प्रभाव कमी होऊन तो प्रश्न विचारण्याची नैतिक वैज्ञानिक प्रवृत्ती निर्माण करतो. त्यामुळे विवेक निर्माण होऊन स्वाभिमानाची वृत्ती निर्माण होते. “अत्तवग्ग” तुन तो शील, प्रामाणिकता व नैतिकता याचे पाठ शिकतो.

सामाजिक अधिष्ठानाच्या दृष्टीने समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य आणि मानवतावाद याविषयी तो धम्मपदातून पदोपदी शिकवण ग्रहण करतो. सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट करून ‘कर्मसिद्धांत’ शिकतो. योग्य कर्माने योग्य ध्येय कसे प्राप्त होते हे तो अनुभवाने शिकतो. विषमता दूर करतो, माणूस म्हणून घडण्यास प्रवृत्त होतो. मन, वाणी, कृती यांचे संयम शिकतो, म्हणजेच तो शांतता व सुव्यवस्थेची शिकवण शिकतो. धम्मपद ग्रंथामुळे विद्यार्थी हा श्रद्धावान बनतो पण अंधश्रद्धेतून मुक्त होतो. कर्मकांड यज्ञयाग सोडून वैज्ञानिक दृष्टिकोन स्विकारून सदाचरणाच्या माध्यमातून मानवी कल्याणाशी ‘धम्म’ जोडल्यामुळे विद्यार्थी नवचैतन्य निर्मितीचे प्रभावी साधन बनतो.

धम्मपद ग्रंथ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी मार्गदर्शक ठरतो. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नाही तर व्यक्तिमत्व घडण्याची प्रक्रिया होय. ही भूमिका धम्मपद ग्रंथ स्पष्टपणे मांडतो. सर्व गोष्टींचे मूळ मन, "मनोपुब्बङ्गामा धम्मा मनोसेट्ठा मनोमया |"[१] सर्व धर्म मनात आधी उत्पन्न होतात. हा विचार एकाग्रता सकारात्मक विचारसरणी आणि स्वनियंत्रण यांचे महत्त्व यमक वग्ग शिकवितो. मन स्थिर व शुद्ध असेल तर योग्य ध्येय प्राप्ती करणे सुलभ होते. शील, प्रामाणिकता, संयम, परिश्रम, अनुशासन या गुणांमुळे तो जबाबदार नागरिक घडतो. चुकीचे करण्यापासून परावृत्त होऊन योग्य व्यक्ती होण्याची प्रेरणा धम्मपदातून मिळते.

योग्य ध्येयप्राप्तीसाठी आळस सोडून परिश्रम करणे, " उट्ठाणतो सतीमतो, सुचिकम्मास्स निसम्माकारिनो |"[२] उद्योगी, जागृत, योग्य कार्य करणारा विचारपूर्वक संयमी कार्य करणारा आळसरहित मनुष्य यश प्राप्तच करतो. सातत्याचे महत्त्व निष्काळजीपणा हे अपयशाचे कारण आहे. "अप्पमत्ता न मीयन्ति, ये पमत्ता यथा मत्ता |" [३] अप्रमाद हे मृत्यूकडे नेणारा आहे. हे जाणून तो सतत प्रयत्न व जागरूकतेने ध्येयाकडे जाण्याच्या मार्गावर आरूढ होतो. हे अपमाद वग्गातून अत्यंत उपयुक्तपणे शिकतो. स्वतःवर स्वयंविश्वास व विवेक निर्माण करण्यास मदत अत्तवग्ग करतो. "अत्ता हि अन्तानो नाथो कि हि नाथो पयो सिया |"[४] स्वतः आपला स्वामी आहेस, दुसरा कोण स्वामी होऊ शकणार. कोणत्याही गोष्टीचे अंधानुकरण न करता योग्य अयोग्याच्या निर्णय घेण्याचा विचार करण्याची सवय अत्तवग्ग लावते. त्यामुळे ते जीवनात यशस्वी होण्यास सक्षम बनतात.

धम्मपद ग्रंथ हा विद्यार्थ्यांसाठी बौद्धिक, मानसिक व नैतिक विकासाचा दीपस्तंभ आहे. कारण या ग्रंथाच्या आधारे विद्यार्थी जीवनातील नैतिकता, मनाचा संयम,

सजगता, कर्म, करुणा, स्व-विकास याचे मार्गदर्शन मिळवितो. चांगल्या मनाने केलेले कार्य सुखाकडे नेते याचा अभ्यास शिकतो. मनाच्या अस्थायी भावावर प्रयत्नपूर्वक कार्य केल्याने एकाग्रता मिळविता येते हे अनुभवातून शिकतो.

विद्यार्थी जीवनात प्रामाणिकता, मेहनत, मोठ्यांचा आदर करणे, दुसऱ्यांच्या मनाचा सन्मान करणे, योग्य मार्गावर चालणे, हे पंडितवग्गातून तो शिकतो. "कण्ह धम्मा विप्पहाय सुक्क भावेय पंडितो" |[५] पाप कर्म सोडून शुभ कर्म करावे. तर आळसरहित जीवन जगणे, प्रयत्नशील असणे योग्य कृती करणे, अयोग्य गोष्टीपासून सावध राहणे, शीलवान होणे याचे महत्त्व तो अप्पमादवग्गातून शिकतो. परीक्षेच्या दरम्यान तणाव निर्माण होणे, त्याचप्रमाणे परीक्षापश्चात देखील गुणदानामुळे ताण येणे इत्यादी सारख्या मानसिक तणाव व दुःखावर मात करण्यासाठी मग्गवग्ग त्याला शिकवण देते. "योगा वे जायती भूरि आयोगा भूरिसङ्खयो"|[६] योग्य अभ्यासाने ज्ञान वाढते, नाहीतर क्षय होतो. परीक्षा स्पर्धा, अपयश, यामुळे येणारे दुःख त्यावर मात करण्यासाठी अज्ञानातून ज्ञानाकडे वाटचाल करण्यासाठी अडंगिक मार्ग त्यावर कसा उपयोगी आहे हे तो बुद्धवग्गातून शिकतो. "अरियो अट्ठंगिको मग्गो दुक्खा विमुत्ति होति|"[७] अष्टांगिक मार्गाने दुःखातून मुक्ती आहे.

विद्यार्थ्यांना भावनिकदृष्ट्या मजबूत बनविण्याचे कार्य धम्मपदातील पंडितवग्ग, अत्तवग्ग, सुखवग्ग, चित्तवग्ग, पापवग्ग, जरावग्ग, लोकवग्ग त्याला मार्गदर्शक म्हणून कार्य करतात. त्याला निराशेतून बाहेर येण्यासाठी स्वतःच स्वतःचा प्रकाश व्हा "अत्ता हि अत्तनो नाथो, अत्ता हि अत्तनो गति।"[८] स्वतःचे स्वामी स्वतः आहात, स्वतःची गती स्वतः आहात. अत्त-दीप-भवची शिकवण धम्मपदातून मिळते. "पण्डितो चित्तं रक्खति। रक्खितं चित्तं सुखावहं होति।"[९] बुद्धिमान मनाचे रक्षण करते. रक्षित चित्त

सुख देणारे आहे. बाह्य गोष्टींच्या प्रलोभनात न पडता, व नशिबावर, दैवावर अवलंबून न राहता प्रयत्नशील व्हावे सातत्याने प्रयत्न करून “न नग्गचरिया न जटा न पङ्का नानासका थाण्डिलसयिका" |१० नग्न राहिल्याने, जटा ठेवल्याने, नाना भस्म लावल्याने कोणी शुद्ध होत नाही. स्वतःवर विश्वास ठेवून स्व प्रेरणे प्रयत्न करणे, यशस्वी होण्याचे ध्येय धम्मपद शिकवितो त्यामुळे तो चरित्रवान बनतो.

**निष्कर्ष**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे दीपस्तंभ धम्मपद हे विधान सत्य, उपयुक्त व सार्थ आहे. कारण शिक्षणामुळे मनुष्य चरित्रवान घडतो. शिक्षण प्रक्रियेतील पदवी, संशोधन, स्पर्धापरीक्षा व्यावसायिक अभ्यासक्रम हे केवळ ज्ञान मिळविणे यापुरतेचमर्यादित असले तरी मात्र मनाची एकाग्रता, तणाव, व्यवस्थापन आणि स्वतःच्या विकासासाठी योग्य अशा मार्गदर्शनाकारीता धम्मपद हा एकमेव ग्रंथ उपयुक्त व मोलाचा ठरतो. या ग्रंथाची प्रत्येक गाथा ही प्रेरणादायी आहे. उच्च ध्येयाकडे नेणारी आहे सोबतच मानवी स्वभावावर राग, द्वेष, मोह यावर मात करता येते. मतपरिवर्तन करता येते. स्वतःवर संयम ठेवता येते याची शिकवण धम्मपद ग्रंथात मिळते. विद्यार्थी जीवनात अभ्यास, रिसर्च प्रकल्प, तयार करण्यासाठी मनाला दीर्घकाळ एकाग्र ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी चित्तवग्ग सहाय्यक ठरते. मनाला प्रशिक्षण व निरीक्षणाच्या माध्यमातून शांत करण्याची प्रक्रिया येथे सांगितली आहे.

धम्मपद ग्रंथात समानता, नैतिकता, शील शिकविले आहे. तणाव रहीत जीवनाचे मार्ग आहेत. तणाव अपयश आणि भावनिक संतुलन यातून “अनिच्चवाद” तो शिकतो. खरा विद्वान कोण आहे हे पंडितवग्गातून जाणतो. धम्मपद ग्रंथामुळे अष्टांगिक मार्गाचा तो अभ्यासक बनतो. ज्या प्रज्ञाशील समाधीचा तो अभ्यास करतो त्या प्रज्ञेमुळे तो योग्य

व अयोग्य यातील फरक शिकतो, तर शीलामुळे तो शिस्तबद्ध आणि नैतिक जीवन कसे जगावे हे शिकतो, तर समाधीमुळे तो स्मरणशक्ती आणि मनाची एकाग्रता वाढविणे शिकतो. यामुळे विद्यार्थी केवळ साक्षरच नाही तर सुसंस्कृत आणि मानवतावादी बनतो.

**संदर्भ ग्रंथ**


1. 'यमकवग्ग (धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र.१*
2. 'अप्पमादवग्ग '(धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र.८*
3. 'अप्पमादवग्ग '(धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र. ४०*
4. 'अत्तववग्ग' (धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र. २०*
5. 'पंडितवग्ग' (धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र.६७*
6. 'मग्गवग्ग' (धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र. ४७*
7. 'भिक्खुवग्ग' (धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र.८७*
8. 'भिक्खुवग्ग' (धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र.८९*
9. 'चित्तवग्ग' (धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र.०९*
10. 'दण्डवग्ग' (धम्मपद) डॉ. भदंत आनंद कौशल्यान, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र.३५*